भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये | Rs. 100

रु. 100 | ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2018 © UD 212081

अनुक्रमांक १५६९२ दिनांक २६/१२/१८ रुपये १००

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरण्यात आहे

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र.

मुद्रांक धारकाचे संपूर्ण नाव १) दि माळेगाव सहकारी

संपूर्ण पत्ता साखर कारखाना माळेगाव

हस्ते असल्यास नाव शिवनगर बारामती

पत्ता

मुद्रांक धारकाचे/हस्ते व्यक्तीची सही

स्वाक्षरी
(श्री.अनिल [illegible])
मुद्रांक विक्रेता, परवाना क्र. [illegible]०३०१७
परवान्याची मुदत ३१/०३/२०२१
पत्ता-तहसिल कंपाऊंड,बारामती

उप कोषागार कार्यालय बारामती
17 DEC 2018
उपकोषागार अधिकारी
बारामती

**भाडेपट्टा**

१] दि माळेगांव सहकारी साखर कारखाना लि; शिवनगर तर्फे
श्री विजय मुगुटराव वाबळे, कार्यकारी संचालक.
धंदा -नोकरी. रा. शिवनगर. ता. बारामती. जि. पुणे. } लिहुन घेणार

२] शिशुविहार, शिवनगर तर्फे
कु. मीरा नारायण पाडळे, मुख्याध्यापिका, ता.बारामती. जि.पुणे
सार्वजनिक विश्वस्त कायदा अधिनियम १९५० रजि. नं. एफ ५५९५ (पुणे)
संस्था नोंदणी अधिनियम १८६० रजि. क्र. महाराष्ट्र /४३८७ /८९ पुणे } लिहुन देणार

१) या भाडेपट्टा करारातील परिशिष्ठ "अ" मध्ये वर्णन असलेली मिळकत आमची संस्थेच्या मालकीची व वहीवाटीची असुन ती तुम्हाला भाडेपट्टयाने देण्याचा आम्हाला पुर्ण हक्क व अधिकार आहे.

२) आपण परिशिष्ठ "अ" मध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे मालकी वहिवाटीची जागा तुम्हांस आवश्यक असलेने व सदर जागा भाडेपट्टयाने देण्याची असलेने आपल्यामध्ये बोलणी व चर्चा होऊन आपापसात झालेली बोलणी या कराराने सदरची बोलणी लेखी करण्याची ठरवलेली असल्याने व आपणाशी झालेली बोलणी व ठरलेल्या शर्ती व अटी उभयतांना मान्य व कबुल असलेने त्या सर्व अटी / शर्ती या करारात लिहिलेल्या आहेत.

३) परिशिष्ठात उल्लेखलेली जागा आमचे पुर्ण मालकीची व आमच्या ताब्यात व वहिवाटीस आहे. सदर जागेत कुळ भाडेकरू नाहीत. जागेवर दुसरे कोणाचाही मालकी हक्क, हितसंबंध व सोसायटीचा किंवा कोणाचाही बोजा नाही. सदर मिळकत दुसरे कोणाकडे गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदी, मेहेरनजर दिलेली नाही. अगर तसे करण्याचा लेखी अगर तोंडी करारही केलेला नाही. त्यावर कोणाचाही अन्न वस्त्राचा बोजा नाही. तसेच सदर जागा कुठल्याही दाव्याचा विषय नाही. अशा रितीने जागा निर्वेध व निर्जोखमी असुन व तसा तुम्हास पुर्ण भरवसा देऊन ती तुम्हास भाडेपट्याने देणेचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर जागेवर कोणीही हक्क अथवा हितसंबंध दाखविलेस / सांगितलेस सदर हरकत आम्ही तुम्हास भाडेपट्टा करणेपुर्वी स्वखर्चाने निवारण करून देणार आहे.

४) सदरची जागा आम्ही सदरचे करारापोटी तुमच्या ताब्यात दिलेली आहे. व सदर जागेत लिहुन देणार यांनी आवश्यकतेनुसार सुधारणा करणेसाठी आमची व गरजेनुसार सरकारी दप्तरी आवश्यक त्या ठिकाणी अर्ज करून परवानगी घेणे आवश्यक आहे.

५) सदर जागेचा तुम्हांस लिहुन देणारांना ताबा दिलेला असलेने तुम्ही त्या जागेचा उपभोग घेणेसाठी या कराराने माझी पुर्ण संमत्ती आहे. सदर भाडेपट्टा दहा वर्षे मुदतीचा दिलेला आहे.

६) सदर भाडेपट्टयापोटी वार्षिक भाडे म्हणुन आम्हाला लिहुन देणार यांनी रूपये १००/- देणेचे ठरले आहे. त्यामुळे मी तुम्हास भाडेपट्टा करून देत आहे. सदर जागेचे वार्षिक भाडे रूपये १००/- प्रमाणे दिनांक ०१/१०/२०१७ ते ३०/०९/२११६ या ९९ वर्षाचे ठरले असुन भाडेपट्टयाचे एकंदर रक्कम रूपये ९९००/- भाड्यापोटी लिहुन देणार लिहुन घेणार यांना देणार असलेने सदर भाडेपट्टा हा कायद्यान्वये रजिस्टर करणे आवश्यक नाही.

७) सदर जागेचे सरकारी सर्व पुर्वीचे कर व देणी मी रजिस्टर भाडेपट्टा करून देईपर्यंत स्वतः लिहुन घेणार यांनी भरलेले आहेत.

८) सदर भाडेपट्टा करार हे दोघांच्या म्हणजेच भाडेपट्टा लिहुन देणार व घेणार यांचे दरम्यान आज मितीस जी बोलणी ठरलेली आहेत त्याबद्दल काही लेखी दस्त असावा म्हणुन सदर करार केलेला आहे. सदर दस्त कायद्याने रजिस्टर करणे आवश्यक व बंधनकारक नसलेने रजिस्टर केलेला नाही.

९) सदरचा भाडेपट्टा करारातील मजकुर समजुन / उमजुन व अक्कल हुशारीने लिहुन दिलेला आहे.

१०) दहा वर्षाची मुदत संपलेनंतर पुढील मुदतीकरीता उभय पक्षी पुर्नविचार केले जाईल.

## - परिशिष्ठ अ -

भाडेपट्टा देण्याचे ठरलेल्या जागेचे/इमारतीचे वर्णन :

मौजे माळेगाव ता.बारामती. जि.पुणे व रिजिस्ट्रेशन सब डिस्ट्रीक्ट बारामती

येथील जमिन / जागा

| ग.नं. | व्हरांडा | खोल्या | हॉल | सॅनिटरी | चतुसि:मा |
|---|---|---|---|---|---|
| ४८० | ६२०० चौ.फुट | २२ X१८ १४ खोल्या | ३३X१८ १ हॉल | ३६X१० २ ब्लॉक | पुर्व : रस्ता (एम डी बंगला) पश्चिम: माळेगांव शिरवली रस्ता दक्षिण: रिकामी जागा उत्तर : कामगार वसाहत |

साक्षीदार

१) नांव घोरपडे रणजीत प्रतापसिंह

पत्ता शिवनगर

सही

२) नांव

पत्ता

सही

भाडेपट्टा करून घेणार

१) कारखान्यातर्फे कार्यकारी संचालक.

श्री विजय मुगुटराव वाबळे,

सही

भाडेपट्टा करून देणार

२)शिशुविहारतर्फे, मुख्याध्यापिका शिवनगर

कु. मीरा नारायण पाडळे

सही